बीड । शनिवार
११.०१.२०२५
वर्षे : ४ अंक : २७५
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● epaper.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●dailymarathwadapatra2021@gmail.com ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post:Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 ●Mo. 9822152955

# शेतकरी कर्जमाफी लटकणार !

## फडणवीसांच्या घोषणेवर अजितदादांचे प्रश्नचिन्ह

**पुणे । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत देवेंद्र फडणवीस यांनी कर्जमाफीची घोषणा केली होती. निकालानंतरही त्यांनी कर्जमाफी योग्य वेळी करण्यात येईल, असे विधान केले होते. मात्र, फडणवीसांच्या कर्जमाफीच्या घोषणेवर खुद्द अर्थमंत्री अजित पवार यांनीच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. दौंडमधील एका कार्यक्रमा बोलताना माझ्या भाषणात तुम्ही कधी कर्जमाफीचा विषय ऐकला का ? .... अंथरूण पाहून हातपाय पसरायचे असता असे सांगून फडणवीसांच्या कर्जमाफीच्या घोषणेबाबत अनिश्चितता निर्माण केली आहे. दौंड तालुक्यातील दौंड विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या कार्यक्रमात बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शेतकरी कर्जमाफीबाबत भाष्य केले आहे. या कार्यक्रमात बोलताना




तुमच्या कानावर काही चुकीचं आलं, तर तुम्ही मला येऊन सांगा. दर आठवड्यातून एक दिवस पुण्याला मी थांबणार आहे. याशिवाय बारामतीलाही थांबण्याचा माझा प्रयत्न राहणार आहे. बारामती तुम्हा दौंडच्या जनतेला जवळच आहे. तुम्ही तुमची कामं येऊन सांगत जावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार हे आपल्या भाषणातून करत होते. तेवढ्यात उपस्थितांमधून कर्जमाफीचा निर्णय कधी घेणार, अशी विचारणा झाला. त्यावर अजितदादा म्हणाले, माझा भाषणात तुम्ही कधी कर्जमाफीचा विषय ऐकला का हो?. विधानसभा निवडणुकीत मी जेवढी भाषणं केली... हे बघ... अंथरूण पाहून हातपाय पसरायचे असतात.

राज्याचा आर्थिक गाडा आपल्याकडे आहे. आपण दोघं नंतर बसू...मी तुला माझी परिस्थिती सांगतो... मग तू मला तुझा सल्ला दे. मग त्याच्यातून काही जमत असेल तर आपण कर्जमाफीही करू. आपण करायला कमी पडणार नाही, असेही अजित पवार यांनी सांगितले.

## धनंजय मुंडे यांनी घेतली ज्येष्ठ नेते छगन भुजबळांची सदिच्छा भेट अन् आशीर्वाद



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री छगन भुजबळ यांची मुंबई येथील निवासस्थानी सदिच्छा भेट घेऊन आशीर्वाद घेतले आहेत. ज्येष्ठ नेते छगन भुजबळ हे मागील काळामध्ये बरेच वर्ष अन्न व नागरी पुरवठा खात्याचे मंत्री राहिलेले आहेत, त्यादृष्टीने या विभागाचे कामकाज अधिक प्रभावीपणे करण्यासाठी धनंजय मुंडे यांनी श्री छगन भुजबळ यांच्याकडून मार्गदर्शनही घेतले असल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. दरम्यान धनंजय मुंडे यांनी आज मंत्रालयातील त्यांच्या दालनामध्ये अन्न व नागरी पुरवठा तसेच ग्राहक संरक्षण मंत्रालयाच्या सचिव श्रीमती जयश्री भोज यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांची चर्चा करत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुचवलेला शंभर दिवसांचा कृती कार्यक्रम शंभर टक्के यशस्वी करण्याच्या दृष्टीने व अधिक प्रभावी पद्धतीने कामकाज करण्याच्या दृष्टीने विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना केल्या आहेत.

## ना. पंकजाताई मुंडे यांचा सत्कार



**गेवराई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन कॅबिनेट मंत्रीपदी पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांची निवड झाल्याबद्दल मुंबई येथे मंत्रालयात भेट घेऊन त्यांना छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वरुढ पुतळा व रामचंद्र –लक्ष्मण– जानकी राम लल्ला फ्रेम व मोत्याची माळ देऊन सत्कार करण्यात आला यावेळी सत्कार करताना भारतीय जनता पार्टी सरचिटणीस तथा दैनिक बीड वास्तव उपसंपादक

दी वैद्यनाथ बँक सल्लागार नोटरी ड राहुलकुमार सुरेशचंद्र राका, भाजपा युवा नेते बलभीम बारगजे, भाजपा विद्यार्थी आघाडी तालुकाध्यक्ष सचिन दाभाडे दिसत आहेत. यावेळी पंकजाताई यांनी सदस्यता नोंदणी व पक्ष संघटना वाढीसाठी काम करावे असे सुचित केले व गेवराई तालुक्यातील भारतीय जनता पार्टी चा कार्यकर्त्यांना व गोपीनाथ मुंडे साहेबांवर प्रेम करणार्या सर्व कार्यकर्ते ना पदाधिकारी ना ताकद देणार व संपूर्ण सहकार्य करणार अशी स्पष्ट ग्वाही सत्कार स्वीकारताना सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना दिली .

## सीनिअर क्रिकेटसाठी निवड चाचणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्यावतीने सीनियर वयोगटातील संघ निवडीसाठी शनिवारी (दि.११) दुपारी २ वाजता बीड येथील मल्टीपर्पज ग्राउंडवर निवड चाचणी आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या सीनियर वयोगटातील निमंत्रितांच्या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी बीड जिल्हा संघ निवडीसाठी ही चाचणी होत असून पात्र खेळाडूंनी पूर्ण गणवेशात आधार कार्ड, जन्मप्रमाणपत्राच्या दाखला व प्रवेश शुल्कासह वेळेवर उपस्थित राहावे.

## सरपंच संतोष देशमुख खुन प्रकरणाची राष्ट्रीय मानवाधिकार आयोगही करणार चौकशी

### खा. सोनवणे यांची माहिती

**बीड । प्रतिनिधी**

मस्साजोग (ता. केज) येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करुन हत्या प्रकरणात राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानेही दखल घेतली असून आयोगाने स्वतंत्र गुन्हा नोंद करुन घेतल्याची माहिती, खासदार बजरंग सोनवणे यांनी दिली. तपास यंत्रणांसह आता मानवाधिकार आयोग देखील या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करणार आहे. ता. नऊ डिसेंबर



रोजी संतोष देशमुख यांचे अपहरण करुन खुन करण्यात आला. या प्रकरणी केज पोलिस ठाण्यात राष्ट्रवादी काँग्रेसचा तत्कालिन केज तालुकाध्यक्ष विष्णू चाटे, सुदर्शन घुले, सुधीर सांगळे, कृष्णा आंधळे, प्रतिक घुले, जयराम चाटे व महेश केदार या सात जणांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला.

या प्रकरणाचा तपास गुन्हे अन्वेषण विभागाच्या पुणे येथील आर्थिक गुन्हे शाखेचे पोलिस उपमहानिरीक्षक डॉ. बसवराज तेली यांच्या अध्यक्षतेखालील विशेष पथक करत आहे. तपासात मस्साजोग येथीलच सिद्धार्थ सोनवणे याने आरोपींना संतोष देशमुख यांचे लोकेशन पुरवल्याचे समोर आल्याने त्याच्यावरही गुन्हा नोंद करुन अटक झाली आहे. या गुन्ह्यातील कृष्णा आंधळे अद्यापही फरार आहे.

## विधानसभा निवडणुकीत परळीत २०१ बूथ ताब्यात घेऊन मतदान करण्यात आलं, जितेंद्र आव्हाड यांचा आरोप

**मुंबई । प्रतिनिधी**



विधानसभा निवडणुकीत परळी मतदारसंघात २०१ बूथ ताब्यात घेऊन मतदान करण्यात आलं, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. त्यांनी आपल्या द अकाउंटवर एक रिपोस्ट करत व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओत एक व्यक्ती मतदान करताना दिसत आहे. ही व्यक्ती अजित पवार गटाला मतदान करताना दिसत आहे.

हा व्हिडीओ शेअर करताना जितेंद्र आव्हाड म्हणाले आहेत की, परळी मतदारसंघात २०१ बूथ ताब्यात घेऊन मतदान करण्यात आले. शाई लावायची आणि बाहेर जायचे मतदान केंद्राच्या आतमध्ये तुमचे बटन दाबण्याचे काम ही गँग करायची. ते म्हणाले की, विधानसभा निवडणुकीनंतर लोकांच्या मनामध्ये ईव्हीएम आणि निवडणुकी संदर्भात अनेक शंका झाल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे परळी विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार राजेसाहेब देशमुख हे होते. ते निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक मतदान केंद्रात जात होते.

आव्हाड म्हणाले, परळी विधानसभा मतदारसंघात एकूण ३९६ बूथ आहे. लोकसभा निवडणुकीत झालेल्या धांदळीनंतर उच्च न्यायालयाने १२२ बूथ अतिसंवेदनशील असल्याचे म्हटले होते. या बुथवर अतिरिक्त सुरक्षा पूर्व, असं म्हटलं होतं. या बुथवर सुरक्षा पुरवण्याची जबाबदारी जिल्हा अधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक तसेच निवडणूक अधिकाऱ्यांची होती. मात्र या निवडणुकीत २०१ बुथवर हल्ले झाले होते. तर १०१ बूथ कॅप्चर करण्यात आले होते.




## एस पी ऑफिस येथे वाहन चालक मालक मार्गदर्शक कार्यक्रम संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

रस्ता सुरक्षा सप्ताहाच्या अनुषंगाने वाहन चालक–मालक यांना मार्गदर्शनपर कार्यक्रम पोलीस अधीक्षक कार्यालय येथे आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमाकरिता माननीय अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर विधी सेवा प्राधिकरण चे सचिव श्री सोनी साहेब , सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष सानप, आरटीओ इन्स्पेक्टर श्री जाधव एडवोकेट आनंद कुलकर्णी एडवोकेट अमित रोकडे चालक–मालक संघटनेचे अध्यक्ष श्री विजय नाना काकडे बाबुभाई अत्तार श्री शर्मा व चालक–मालक मोठ्या



प्रमाणावर उपस्थित होते सदर कार्यक्रमादरम्यान माननीय सोनी सर यांनी मोटर वाहन कायदा व विविध नियम कोर्टाचे निकाल हिट अँड रन इत्यादी विषयावर म ार्गदर्शन केले तसेच अप्पर पोलीस अधीक्षक यांनीही मार्गदर्शन केले तसेच एडवोकेट आनंद कुलकर्णी यांनी वाहनांचा विमा व वाहन चालकांचा विमा या विषयावर म ार्गदर्शन केले तसेच अमित रोकडे यांनी मोटर वाहन कायद्यावर मार्गदर्शन केले सुभाष सानप यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## जवान राजेंद्र मुंडेंच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**केज । प्रतिनिधी**

दहिफळ वडमाऊली ( ता. केज) येथील भारतीय सैन्य दलातील कार्यरत जवान राजेंद्र विक्रम मुंडे यांचे आजाराने९ जानेवारी रोजी दिल्ली येथील रुग्णालयात निधन झाले होते. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. म ागील १३ वर्षापासून राजेंद्र विक्रम मुंडे हे भारतीय सैन्य दलाच्या सिग्नल विभागात सेवेत होते. मागील आठ महिन्यापासून ब्रेन ट्युमर आजाराम ुळे त्यांच्यावर दिल्ली येथील सैन्य दलाच्या हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. मात्र ९ जानेवारी रोजी त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू



झाला. त्यांचे पार्थिव विशेष विम ानाने दिल्ली येथून पुणे येथे आणून त्यानंतर लष्कराच्या रुग्णवाहिकेने त्यांचे पार्थिव मुळगाव दहिफळ (वडमाउली) येथील घरी शुक्रवारी सकाळी ८.३० वाजता आणण्यात आले. अंत्यदर्शनानंतर सकाळी १०.३० वाजता अंत्यविधी स्थळी नेण्यात आले. यावेळी अमर रहे अमर रहे जवान राजेंद्र मुंडे अमर रहे अशा घोषणा देण्यात आल्या. तिरंगा ध्वजात लपटलेला मृतदेह काढण्यात आला. पुष्पचक्र वाहून आदरांजली वाहण्यात आली. जिल्हा पोलीस दलाच्या वतीने जिल्हा पोलीस दलाच्या वतीने बंदुकीच्या हवेत फैऱ्या झाडून मानवंदना दिल्यानंतर त्यांचे वडील विक्रम मुंडे व त्यांच्या पाच वर्षांच्या मुलाने मुखाग्नी दिला.

## जिल्हा पुरवठा विभागाच्या विरोधात हमाल माथाडी कामगारांचे लाक्षणिक कामबंद आंदोलन

**माजलगाव । प्रतिनिधी**

जिल्हा पुरवठा विभागाकडून हमाल माथाडी कामगार यांची पिळवणूक होत तर केलेल्या कामाची बिल देण्यास विलंब केला जात आहे यामुळे जिल्हा पुरवठा विभागाच्या विरोधात आज दि. १०/०१/२०२५ रोजी हमाल माथाडी कामगार युनियनचे अध्यक्ष राजकुमार घायाळ यांच्या नेतृत्वाखाली काम बंद आंदोलन करण्यात आले.

हमाल माथाडी कामगारांच्या अनेक मागण्या बाबत आम्ही वारंवार विनंती करुनही दखल घेतली जात नसल्याने पुन्हा एकदा आंदोलन करावे लागते. जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील पुरवठा विभागाच्या गोदामात काम करणाऱ्या हमाल माथाडी कामगार यांना त्यांच्या कामाचा मोबदला तात्काळ देण्यात यावा व इतर विविध मागण्यासाठी हे लाक्षणिक काम बंद आंदोलन करण्यात आले यावेळी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात खालील मागण्या पूर्ण करण्यात याव्या अशी मागणी करण्यात आली–

१. ऑगस्ट, सप्टें, ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर २०२४ ची नियमित कामाची हमाली तात्काळ मिळावी. २. माथाडी नियामानूसार दरमहा वेतन जमा न करणाऱ्याकडून १०% दंडाची वसूल करण्यात यावी. ३. बीड शहर गोदामातील हमालांना बेकायदेशीर रित्या कामावरुन कमी केल्याने त्यांना तात्काळ कामावर घेण्या यावे व माथाडी मंडळाने नियूक्त न केलेल्या काम गाराकडून काम करुन घेतल्याने संबंधीत नियूक्त कामगारांचे अर्थिक गळचेपी होत असल्याने त्यांना त्वरीत कामावर घेण्याच्या सूचना द्याव्यात अशी विनंती असे न झाल्यास माथाडी कायद्यातील तरतूदीनूसार कार्यवाही व्हावी. ४. मा. उच्च न्यायालयाने १ ऑगष्ट २०२३ रोजी माहे मार्च २०१२ पासूनचा महागाई निर्देशांकाचा फरक देण्याबाबत आदेश दिला मात्र पुरवठा विभागास वेळोवेळी अवगत करुनही फरक मिळाला नाही तात्काळ फरक देण्यात यावा.५. थेट वाहतूक टप्पा १ व टप्पा २ साठी गोदामातील नियूक्त हमालांचा रोजगार कमी होत असल्याने संबंधीत कंत्राटदाराने ज्या त्या गोदामातील नोंदीत हम ालांकडूनच काम करुन घ्यावे.

## केज पोलिसांनी १२ गोवंशीय गुरांचा टेम्पो पकडला



**केज । प्रतिनिधी**

केजहून गोवंशीय गुरे निर्दयपणे टेम्पोत भरून नेकनूरकडे घेऊन निघालेल्या टेम्पो केज पोलिसांनी पकडला. १२ गोवंशीय गुरे, टेम्पो असा ९ लाख ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. केजहून गायी, बैल, म्हैस घेऊन एक टेम्पो नेकनूरकडे जात असल्याच्या माहितीवरून केजचे सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मीना व केज ठाण्याचे पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्या म ार्गदर्शनाखाली पोलिस कर्मचाऱ्यांनी केज – मांजरसुंबा रस्त्यावरील अंबाळाचा बरड येथे टेम्पो (एम. एच. २५ यु. ०३९४) पकडला. टेम्पोची तपासणी केली असता ५ मोठ्या जर्सी गायी, ३ खिल्लारी बैल,१ जर्सी गायीचे वासरु, १ म्हैस, तिचा १ हाल्या, १ देशी गाय यांना क्रूरतेने निर्दयीपणे टेम्पोत भरल्याचे निदर्शनास आले.

# पी.एम. किसान आणि निराधार योजनेतील लाभार्थ्यांचे अनुदान आठवडाभरात मिळणार

## आ.विजयसिंह पंडित यांनी आयोजित केलेल्या बैठकीत निर्णय



**बीड । प्रतिनिधी**

संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीने पात्र केलेल्या १२ हजार लाभार्थ्यांना मंजुरी आदेश देवून नियमित अनुदान सुरु करावे, कृषी आणि महसुल विभागाच्या अधिकार्यांमध्ये समन्वय नसल्यामुळे प्रलंबित राहिलेल्या पी.एम.किसान योजनेतील ३ हजार पात्र लाभार्थ्यांना तात्काळ अनुदान सुरु करण्यासह ग्राम पंचायत विभक्तीकरण, प्रलंबित मावेजा प्रकरणे यांसह विविध विषयासंदर्भात आ.विजयसिंह पंडित यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेतली. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी या प्रश्नाच्या अनुषंगाने संबंधित अधिकार्यांना सूचना देवून पात्र लाभार्थ्यांना आठवडाभरात अनुदान मिळेल असे आश्वासन दिले. विविध विषयात येणार्या अडचणीच्या अनुषंगाने प्रशासकीय पातळीवर मार्ग काढण्याच्या सूचना त्यांनी यावेळी केल्या. बैठकीला जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. गेवराई विधानसभा मतदारसंघातील विविध विषयांच्या अनुषंगाने आ.विजयसिंह पंडित यांनी जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची भेट घेतली. संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीने गेवराई तालुक्यातील सुमारे १२ हजार पात्र लाभार्थ्यांचे अर्ज मंजुर केले आहेत.

## श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे शिवाजी महाराज येवले यांचे कीर्तन

**बीड । प्रतिनिधी**



विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २७ व्या वर्षातील पाचव्या पुण्यतिथी पौष शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. शिवाजी महाराज येवले हनुमान टेकडी नायगाव ता.ज़ि बीड यांचे सोमवार दिनांक १३ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी मंडळी जवळा ता. जि.बीड यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

## गरिबांची लेकरं शिकून मोठी झाली याचा मला आनंद आहे : शिवाजीराव पंडित

### शिवशारदा पब्लिक स्कूलचा वर्धापन दिन थाटात साजरा

**गेवराई । प्रतिनिधी**



गरिब आणि सर्वसामान्यांची लेकरं शिकावी, मोठी व्हावी, मोठ्या पदावर जावी हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून मी गेवराई तालुक्यात शिक्षणाचे जाळे गुंफले. आज जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेचा वटवृक्ष झाला आहे. मराठी आणि इंग्रजी शाळांच्या माध्यमातून माझ्या तालुक्यातील सामान्यांची लेकरं डॉक्टर इंजिनियर झाली याचा मला मनस्वी आनंद आहे. माझा हेतू साध्य झाला आहे. शिव शारदा पब्लिक स्कूलच्या माध्यमातून सामान्यांच्या मुलांना इंग्रजी माध्यमातून शिक्षण मिळाल्यामुळे हे यश पदरी पडले असे भावोद्गार जयभवानी आणि जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव (दादा) पंडित यांनी काढले. शिवाजीनगर गढी येथील शिवशारदा पब्लिक स्कूलच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. गेवराई तालुक्यातील शिवाजीनगर येथील शिवशारदा पब्लिक स्कूलचा २४ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे संस्थापक शिवाजीराव पंडित, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक जगन्नाथ शिंदे, बाबुराव काकडे, शारदा स्पोर्ट्स अक्॓डमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्यासह मान्यवर यावेळी उपस्थित होते प्रारंभी शिवाजीराव पंडित यांच्या हस्ते केक कापून वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

## निधन वार्ता

**तलवाडा । प्रतिनिधी**



तलवाडा येथील जेष्ठ महिला गावातील सर्वाधिक वयोवृद्ध व्येक्तीत्व शेख आजिजबी भिक्कन वय वर्ष(११६) रा. तलवाडा ता. गेवराई यांचे वृद्धपकाळाने त्यांच्या राहत्या घरी दिनांक १०/१/२०२५ रोजी सकाळी ११-२७ वाजता निधन झाले. त्यांचा अंत्यविधी संध्याकाळी ५-३० वाजता तलवाडा येथील मुस्लिम समुदायच्या कब्रिस्तान मध्ये नातेवाईक व आपेष्टांच्या उपस्थितित करण्यात आला. गावातील जेष्ठ महिला व सर्वांशी जिव्हाळ्याने वागना-या म्हणून आजिजबी सर्व परिचित आसल्याने त्यांच्या अंत्यविधीला मोठ्या प्रमाणात दुखांकित अंतकरणाने गावक-यांची उपस्थिति होती.



*बीड: नूतन राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष (शरद पवार गट) राजेंद्र मस्के यांचा सत्कार सोहळा संपन्न.*

## गेवराईतील बँकेच्या फंडयामुळे पिग्मी प्रतिनिधी अडचणीत

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई शहरातील सहकारी बँका आणि पतसंस्था मध्ये व्यवसायिकांच्या अल्पबचत खात्याच्या दैनंदिन रकमेची दुकानात जाऊन संकलन करणाऱ्या पिग्मी प्रतिनिधी वर उपासमाराची वेळ आली आहे बचत खात्याचा निधी संकलित झाला तरच या एजंटला त्या बँकेकडून तीन टक्के कमिशन मिळते त्यावरच त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो मात्र पतसंस्था चालकांकडून चेअरमन यांच्याकडून आर्थिक व्यवहारात अडचण निर्माण झाल्याने पिग्मी निधी संकलन करत असलेल्या पिग्मी प्रतिनिधी यांच्यावर संकटात सापडलेल्याची वेळ आली आहे

पिग्मी प्रतिनिधी यांनी बँकेकडे मोठ्या प्रमाणात बचत खाते काढले आहेत त्यात व्यवसायिक दररोज आपल्या जमा झालेल्या पैशातून काही ठराविक रक्कम बँकेत जमा करतात पण प्रत्येक वेळी बँकेत जाणे शक्य नसल्यामुळे हि रक्कम घेण्यासाठी बँकेने पिग्मी प्रतिनिधी नेमले आहेत पण तीन महिने झाल्याच्या नंतर ही रक्कम विना वजा परत दिले जाते परंतु काही गेवराई शहरातील बँकेमध्ये पिग्मी प्रतिनिधी म्हणून कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्याला जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न होत आहेत विशेष म्हणजे प्रत्येक खातेदारांनी आपापल्या अडचणीच्या काळात आपल्याला मदत होईल यासाठी हे पैसे बचत केले आहेत




## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती टी. ए. आसरकर ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ०६/ २०२५**
**ॲड. टि. व्ही. जाधव यांच्यामार्फत**
**शारदा वगैरे विरुध्द निरंक**

अर्जदार :- १) शारदा बाळकृष्ण काळे, वय ६५ वर्ष, धंदा घरकाम, पत्ता - घारगाव ता. जि. बीड ह.मु. श्री. मंगल को. ऑप. हौसिंग सोसायटी, सि-विंग, घर नं. ९ सी विंग - २ मेन रोड, पोष्ट ऑफिस समोर, धनकवडी, पुणे, २) ब्रिजेश बाळकृष्ण काळे, वय ४२ वर्ष, धंदा व्यापार, घारगांव ता.जि.बीड ह. मु. श्री. मंगल को. ऑप. हौसिंग सोसायटी, सि-विंग, घर नं. ९ सी विंग - २ मेन रोड, पोष्ट ऑफिस समोर, धनकवडी, पुणे, (३) राजेश बाळकृष्ण काळे, वय २९ वर्ष, धंदा व्यापार, घारगांव ता.जि.बीड ह.मु. श्री. मंगल को. ऑप. हौसिंग सोसायटी, सि-विंग, घर नं. ९ सी विंग - २ मेन रोड, पोष्ट ऑफिस समोर, धनकवडी, पुणे

विरुध्द

**मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत **बाळकृष्ण त्रिंबकराव काळे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत बाळकृष्ण त्रिंबकराव काळे यांचा मृत्यु दि. ३०/०९/२०२३ रोजी घर नं. ९, सि - विंग, श्री मंगल को. ऑप. हौसिंग सोसायटी, धनकवडी, पुणे येथे झाला आहे. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ व ३ हे मुले आहेत. मयतास मुलगी नाही. मयताचे आई वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरह अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु **मयत बाळकृष्ण त्रिंबकराव काळे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १० माहे जानेवारी २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १५ फेब्रुवारी २०२५.**

**आदेशावरून.**

**(स्वाक्षरीत)** **शिक्का** **(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक** **अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

---

**मा. ॲड.अजित एम. देशमुख, लवाद अधिकारी, लवाद न्यायाधिकरण, बीड यांचे समोर**

लवाद न्यायाधिकरण कार्यालय, "मधुमीन", डॉ.हाटवटे बिल्डींग, प्रियदर्शनी बाल उद्यानच्या पश्चिमेस, राजीव गांधी चौक, नगर रोड, बीड ता.जि. बीड (मल्टिस्टेट को-ऑपरेटिव सोसायटीज ॲक्ट 2002 व अब्रिटेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)

**जाहीर नोटीस / समन्स** दि. 08/01/2025

अर्जदार : श्री मंगलनाथ मल्टीस्टेट को-ऑप.क्रैडीट सोसायटी लि. माजलगाव ता. माजलगाव जि. बीड

**विरूद्ध - गैरअर्जदार**

1) ल. क्र. 768/2024 1) प्रकाश रामभाऊ गरड 2) अशोक भिमराव गरड 3) रासवे दिपक दगडुबा रा. वांगी बु. ता. माजलगांव जि. बीड
2) ल. क्र. 771/2024 1) शेंडगे सखाराम रावसाहेब 2) सोळंके चंद्रकांत मदनराव 3) शेंडगे विलास रावसाहेब रा. चिखली पो. हिंगणी ता. धारूर जि. बीड
3) ल. क्र. 772/2024 1) काठुळे मोहन तुळसिराम 2) काळे बाबुराव दशरथराव 3) काळे राम दशरथराव रा. नाखलगाव पो. वेलुरा ता. माजलगाव जि. बीड
4) ल. क्र. 776/2024 1) केसकर शहाजी भाऊराव रा. सुलतानपुर पो. नित्रुड ता. माजलगाव जि. बीड 2) भोसले बलभिम योगानंद रा. किंडे पिंप्री पो. राजेवाडी ता. माजलगाव जि. बीड 3) गवळी मुरली सुदामराव रा. पिंपळगांव पो. बेलुरा ता. माजलगाव जि. बीड
5) ल. क्र. 777/2024 1) सोळंके गजानन रमेशराव रा. नाखलगाव पो. बेलुरा ता. माजलगाव जि. बीड 2) डोंबरे नितीन संजयराव रा. दिंद्रुड ता. माजलगाव जि. बीड 3) गुजर दिगांबर राजेंद्र रा. नाखलगाव पो. बेलुरा ता. माजलगाव जि. बीड
6) ल. क्र. 778/2024 1) प्रकाश शोभाजी कोकाटे रा. जहागीर मोहा ता. धारूर जि. बीड 2) उजगरे नारायण सिताराम रा. हिंगणी खुर्द ता. धारूर जि. बीड 3) विष्णु नागोराव भालेराव रा. थेटे गव्हाण पो. चोरंबा ता. धारूर जि. बीड
7) ल. क्र. 779/2024 1) मुंडे महादेव व्यंकटराव रा. भायजळी ता. धारूर जि. बीड 2) हुंबाडे बालाजी मारोती रा. जिरगा पो. धामणगाव ता. जळकोट जि. जालना 3) बाबुराव किसन कांबळे रा. आरणवाडी पो. चोरंबा ता. धारूर जि. बीड
8) ल. क्र. 780/2024 1) मुंडे महादेव व्यंकटराव रा. भायजळी ता. धारूर जि. बीड 2) चव्हाण शितल रामकिसन रा. शावेश नगर, केज ता. केज जि. बीड 3) सिरसट मधुकर ज्ञानोबा रा. फुले नगर, केज ता. केज जि. बीड
9) ल. क्र. 785/2024 1) चोरमारे प्रल्हाद तुकाराम 2) शेख अनवर शेख सांडु 3) दोरखे विलास उत्तमराव रा. राजनगांव, सायगांव ता. बदनापुर जि. जालना
10) ल. क्र.791/2024 1) खंडागळे संजय देवीदास रा. आनंदी मथुरा रेसिडेन्सी, समर्थ नगर, जालना ता. जि. जालना 2) चव्हाण माधव विजयकुमार रा. सारसवत रोहाऊस, रेल्वे स्टेशन जवळ, सोनार नगर, जालना ता. जि. जालना 3) सोळंके निवृती प्रभातराव रा. ब्राम्हणखेडा पो. पिरकल्याण ता. जि. जालना
11) ल. क्र.792/2024 1) तनपुरे अशोक रामराव 2) तनपुरे बाळु रामभाऊ दोघे रा. सरस्वती कॉलनी, मेन रोड, परतुर, ता. परतुर जि. जालना 3) सातोनकर महेश वसंतराव रा. सातोनकर गल्ली, परतुर ता. परतुर जि. जालना
12) लवाद अर्ज क्र.794/2024 व 795/2024 1) वाडेकर अशोक ज्ञानदेव रा. कालीका नगर, माजलगाव ता. माजलगाव जि. बीड (कर्जदार) व (जामीनदार)
(प्रत्येक प्रकरणात वर नमुद क्र. 1 हे कर्जदार तर अन्य जामीनदार आहेत.)

या नोटीस द्वारे तुम्हा वरील सर्व गैरअर्जदारांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमच्या विरूद्ध वर नमुद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केले आहेत. सदर लवाद दाव्याच्या सुनावनी नोटीस आपना पैकी काहीनी घेऊन गैरहजर राहिलात. काहीनी नोटीस घेण्यास नकार दिला. तर काहींच्या नमुद पत्यावर नोटीस बजावण्यात आल्या आहेत / नाहीत. तसेच काहींच्या नोटीस तामील होत नाहीत. तरी सदर लवाद अर्जाच्या चौकशी कामी आपण दि. 31/01/2025 रोजी सकाळी 11 वा. या लवाद न्यायाधिकरण कार्यालयात तुम्ही अथवा तुमच्या वकीलांसह हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास या बाबत तुमचे काहीही म्हणने नाही असे समजून तुमच्या विरूद्ध लवाद अर्जाचा एकतर्फी हुकूम / आदेश करण्यात येईल. याची नोद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस / समन्स माझ्या सही व शिक्यांची दिले आहे.

ॲड.अजित एम. देशमुख
लवाद अधिकारी, बीड.

---

**मा. ॲड.अजित एम. देशमुख, लवाद अधिकारी, लवाद न्यायाधिकरण, बीड यांचे समोर**

लवाद न्यायाधिकरण कार्यालय, "मधुमीन", डॉ.हाटवटे बिल्डींग, प्रियदर्शनी बाल उद्यानच्या पश्चिमेस, राजीव गांधी चौक, नगर रोड, बीड ता.जि. बीड (मल्टिस्टेट को-ऑपरेटिव सोसायटीज ॲक्ट 2002 व अब्रिटेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)

**जाहीर नोटीस / समन्स** दि. 08/01/2025

अर्जदार : चंद्रभागा अर्बन मल्टीस्टेट को-ऑप.क्रैडीट सोसायटी लि. दिंद्रुड ता. माजलगाव जि. बीड,

**विरूद्ध - गैरअर्जदार**

1) ल. क्र. 796/2024 1. खटाळ प्रभु गुरुलिंग 2. खटाळ रामेश्वर बाबुराव 3. अब्दागीरे गोविंद सोपान रा. दिंद्रुड ता. माजलगाव जि. बीड
2) ल. क्र. 797/2024 1. दळवे सोमेश्वर दिगांबर 2. ठोकरे गणपती मोतीराम 3. सिरसे बालासाहेब बळीराम रा. रा. दिंद्रुड ता. माजलगाव
3) ल. अर्ज क्र. 798/2024 1. बडे अशोक शिवाजी 2. बडे रमेश शिवाजी 3. बडे राजेभाऊ आप्पाराव रा. देवदहिफळ ता. धारूर जि. बीड
4) ल. अर्ज क्र. 799/2024 1. मुसळे राहुल राजाराम 2. कटारे बप्पाजी त्रिंबक 3. गिराम शंकर पन्नु रा. दिंद्रुड ता. माजलगाव जि. बीड
5) ल. अर्ज क्र. 800/2024 1. मोरे छगन एकनाथ 2. कटारे पांडुरंग भागवत 3. कटारे ज्ञानेश्वर शिवाजी रा. दिंद्रुड ता. माजलगाव जि. बीड
6) ल. अर्ज क्र. 801/2024 1. परविन सादेक शेख 2. बडे विलास शंकर 3. बडे रमेश मारोती रा. देवदहिफळ ता. धारूर जि. बीड
(प्रत्येक प्रकरणात वर नमुद क्र. 1 हे कर्जदार तर अन्य जामीनदार आहेत.)

या नोटीस द्वारे तुम्हा वरील सर्व गैरअर्जदारांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमच्या विरूद्ध वर नमुद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केले आहेत. सदर लवाद दाव्याच्या सुनावनी नोटीस आपना पैकी काहीनी घेऊन गैरहजर राहिलात. काहीनी नोटीस घेण्यास नकार दिला. तर काहींच्या नमुद पत्यावर नोटीस बजावण्यात आल्या आहेत / नाहीत. तसेच काहींच्या नोटीस तामील होत नाहीत. तरी सदर लवाद अर्जाच्या चौकशी कामी आपण दि. 31/01/2025 रोजी सकाळी 11 वा. या लवाद न्यायाधिकरण कार्यालयात तुम्ही अथवा तुमच्या वकीलांन सह हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास या बाबत तुमचे काहीही म्हणने नाही असे समजून तुमच्या विरूद्ध लवाद अर्जाचा एकतर्फी हुकूम / अदेश करण्यात येईल. याची नोद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस / समन्स माझ्या सही व शिक्यांची दिले आहे.

ॲड.अजित एम. देशमुख
लवाद अधिकारी, बीड.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com